# महाराष्ट्र शासन
## राष्ट्रीय आरोग्य अभियान
## आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, ठाणे.
### (कंत्राटी स्वरुपातील पदे भरण्यासाठी जाहिरात)

| अ. क्र. | पदाचे नाव | संस्थेचे नाव | भरावयाच्या पदांची संख्या | जातीच्या संवर्गानुसार भरवयाची पदे | शैक्षणिक अर्हता | मासिक मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ट्रेनिंग इंचार्ज | तालुका प्रशिक्षण केंद्र, विक्रमगड | १ | खुला | एम.बी.बी.एस. ३ वर्षांचा अनुभव, सेवानिवृत्त व प्रशिक्षणाचा अनुभव असणाऱ्या अधिकाऱ्यास प्राधान्य.<br>बी.ए.एम. एस. ३ वर्षाचा अनुभव, सेवानिवृत्त व प्रशिक्षणाचा अनुभव असणाऱ्या अधिकाऱ्यास प्राधान्य. | ६००००/-<br><br>२८०००/- |
| २ | प्रशासकीय अधिकारी | आ व कु क प्र केंद्र, ठाणे | १ | खुला | बी.कॉम./एम.कॉम सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी किंवा तीन वर्षांचा अनुभव आणि एम.एस.-सी.आय.टी. शासकीय सेवेतील अनुभवास प्राधान्य | २००००/- |

**अटी व शर्ती:-**

**१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरूपाची असून नियुक्ती दिनांक ३१/३/२०२३ पर्यंत राहील.**

**२) जाहिरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरूपाची आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागू राहणार नाही, तसेच अर्जदारला शासकीय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.**

**३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुद्ध कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.**

**४) उपरोक्त कंत्राटी पदांकरिता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.**

**५)सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांची निवड झाल्यास सदर पदांकरिता मानधन राज्य स्तरावरून प्राप्त विहित मार्गदर्शक सूचनानुसार मोजमाप करून अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

**६) जाहिरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. याबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष व निवड समिती यांनी राखून ठेवलेले आहेत. -**

**७) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हताधारकास प्राधान्य दिले जाईल. विहित शैक्षणिक पात्रता नसल्यास सदर अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.**

८)प्राप्त झालेल्या अर्जावरून व उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेवरून मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. मेरीट लिस्ट तयार करताना Qualifing Exam मध्ये मिळालेले गुण+ उच्च शैक्षणिक अर्हता + शासकीय/निमशासकीय कार्यालयाचा अनुभव या बाबींचे गुण एकत्र करून मेरीट लिस्ट तयार करण्यात येऊन संबंधीत पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

९). जास्त उमेदवार झाल्यास छाननी अंती एका पदास पाच उमेदवार याप्रमाणे पदानुरूप पदवी/पदविका या शेवटच्या वर्षाच्या गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी गुणांचा कट ऑफ लावण्यात येईल.

१०)जाहिरातीच्या दिवशी सदर पदांसाठी कमाल वयोमार्यादा ट्रेनिंग इंचार्ज पदासाठी ७० वर्षे, इतर पदांकरिता खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागास प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील.

११) अधिकारी/ कर्मचारी या पदांकरिता शासकीय सेवेतून सेवा–निवृत्त/ स्वेच्छा सेवानिवृत्त या पदांकरिता अर्ज करत असल्यास त्यांनी शासकीय सेवेत रुजू झालेली दिनांक, कार्यकाळ, पदनाम व निवृत्त झालेले वर्ष, सेवानिवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व सेवानिवृत्तीनंतर देय असलेले वेतन(पेन्शन) याबाबतची संपूर्ण माहिती अर्जामध्ये नमूद करावी.

१२) शासकीय, निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणाऱ्या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

१३) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत सोईप्रमाणे ठिकाण बदलवून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१४) उपरोक्त पदांपैकी तांत्रिक पदांकरिता तत्सम कौन्सिलकडून रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारास मुलाखतीस अपात्र ठरविण्यात येईल.

१५) भरती प्रक्रिया स्थगित करणे/ रद्द करणे/ पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार अध्यक्ष व निवड समिती यांनी राखून ठेवलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१६) उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित सत्य प्रतिसह आपले अर्ज प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, ठाणे, गणेश उद्यानासमोर, प्रादेशिक मनोरुग्णालय आवार येथे दिनांक २६/४/२०२२ सायंकाळी ६.०० पर्यंत अर्ज सादर करावेत. त्यानंतर आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. एक कोरा लिफाफा ज्यावर रु. ५/- टपाल तिकीट लावून स्वत:चे नाव व पत्ता प्रती या ठिकाणी लिहून अर्जसोबत जोडावा.

१७)सदर भरतीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर वर्षभरात भविष्यात जर एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिल्यामुळे जागा रिक्त झाल्यास प्रतीक्षा यादीवरील उमेदवारास नवीन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील.

१८) खुल्या प्रवर्गासाठी १५०/- रूपयांचा व राखीव प्रवर्गासाठी १००/- रूपयांचा धनाकर्ष HTH & FLY WELFARE TRAINING CENTRE THANE यांच्या नावाने काढण्यात यावा. यांच्या नावे धनाकर्ष नसल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१९) नियुक्ती आदेश मिळाल्यानंतर रुजू होताना आपले सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती सोबत आणाव्यात. अन्यथा आपली नियुक्ती रद्द करणेत येईल याची नोंद घ्यावी.

२०)मुलाखतीची वेळ व दिनांक उमेदवारांना ई मेल व दूरध्वनीद्वारे कळविण्यात येईल. खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मूळ कागदपत्रांच्या साक्षंकीत केलेल्या छायांकित प्रती अर्जाच्या नमुन्याला जोडाव्यात.

शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका

जातीचे प्रमाणपत्र

शाळा सोडल्याचा दाखला/ जन्म तारखेचा दाखला

प्रमाणित केलेली अनुभव प्रमाणपत्रे

शासकीय अनुभव असल्यास अनुभव दाखला

HTH & FLY WELFARE TRAINING CENTRE THANE यांच्या नावाने धनाकर्ष

नावात बदल असल्यास पुरावा

२०)टिप: प्रशासकीय अधिकारी या पदाकरीता सार्वजनिक आरोग्य विभागातील सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी/मुख्य प्रशासकीय अधिकारी यांना शैक्षणिक अट शिथिल राहील.

प्राचार्य
आरोग्य व कुटुंब कल्याण
प्रशिक्षण केंद्र, ठाणे

अर्जाचा नमुना

..........................या पदासाठी अर्ज

| |
|---|
| पासपोर्ट आकाराचा उमेदवाराचा नजिकचा सांक्षाकित फोटो |

प्रती,

**मा.प्राचार्य**

**आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, ठाणे**

| १)संपुर्ण नाव | मराठी | इंग्रजी (कॅपीटल लेटर) |
|---|---|---|
| १)आडनाव | ...................... | .................... |
| २)स्वत:चे नाव | ..................... | .................... |
| ३)वडीलांचे/पतीचे नाव | ..................... | .................... |
| ४)आईचे नाव | ..................... | .................... |

२) पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता (पिनकोडसहित)

....................................................................................................................................

....................................................................................................................................

३)दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक- ......................................

४)जन्मतारीख - ................................

५)कोणत्या प्रवर्गासाठी अर्ज केलेला आहे त्याप्रमाणे चौकटीमध्ये ☑अशी खुण करावी.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा. अ. | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा. प्र. | इ.मा.व | एसईबीसी | आर्थिक मागास प्रवर्ग | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

६)शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नाव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

७)अनुभव

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्ष |
|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

८)आपणांविरुद्ध न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे काय ? असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा.

| होय | नाही |
|---|---|
| | |

९)अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडल्या आहेत.

१) ...............................
२) ...............................
३) ...............................
४) ...............................

१०)अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे का ? होय/नाही

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल आणि माझे विरुद्ध कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

सही/-
नाव ...................................